वाचले :- १) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ ( सरकारी जमीनीचे वितरण नियम १९७१ चे ) नियम ६ व ७ अन्वये
२) शासन परिपत्रक जमीन-१०९१/७१३/प्र.क्र.५९/ज-१/दिनांक २८ जून १९९९.
३) उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांचे पत्र क्र. जमीन/कावि/४४/२०००,दि.२०/१/२०००
४) तहसिलदार, शिरपूर यांचे शेवट होणारे पत्र क्र.गांवठाण/कावि/६२७, दि.२१/१२/२०००

क्र.ब/कक्ष-२/गावठाण/कावि-८५
जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे
दिनांक:- १२ / ०२ /२००१

## आ दे श

अध्यक्ष अध्यापक शिक्षण मंडळ, धुळे यांनी दिनांक १६/९/१९९७ च्या अर्जान्वये मौजे सांगवी येथील माध्यमिक शाळेच्या इमारतीकरिता व वस्तीगृहाकरिता व क्रिडांगणाकरिता सांगवी येथील ग.क्र. १३/१ पैकी १ हे. जमीनीची शैक्षणीक प्रयोजनार्थ मागणी केली आहे.

मौजे सांगवी येथील ग.क्र. १३/१ चे एकूण क्षेत्र ७ हे. ७९ आर. आहे. जमीनीच्या कब्जेदार सदरी सरकार असून इतर हक्क गुरचरण नमूद केले आहे. अध्यक्ष अध्यापक शिक्षण मंडळ, धुळे ही संस्था नोंदणीकृत आहे. मौजे सांगवी येथे सन १९६७ पासून माध्यमिक शाळा सुरु आहे. इ. ५ ते १२ वी पर्यंत एकूण ७४८ विद्यार्थी शाळेत शिक्षण घेत आहेत. ग्रामपंचायत सांगवी यांनी उक्त संस्थेला १ हे. जमीन वितरीत करण्या बाबत ग्रा.पं. ठराव दिनांक २८/८/१९९९ अन्वये संमती दिली आहे. मागणी जमीनीवर अतिक्रमण नाही. जमीन सार्वजनिक प्रयोजनार्थ राखीव नाही.

संस्थेने शाळेची इमारत व वसतीगृह करीता ७४३५ चौ.मी. क्षेत्र व क्रिडांगणाकरिता २५६५ चौ.मी. क्षेत्राची मागणी आहे. वरील क्षेत्राची महसूलमुक्त किंमत रु. अनुक्रमे २६,४९५/- व रु. ९,१३०/- येते. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- ( अक्षरी पन्नास हजार ) आंत असल्याने जिल्हाधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रात येते.

उपरोक्त विवेचनावरुन मी जिल्हाधिकारी, धुळे याव्दारे मौजे सांगवी येथील ग.क्र. १३/१ पैकी प्रस्तावातील पानांक २४५ वरील नकाशात दर्शविलेले शाळेची इमारतीकरिता ४६४७ चौ.मी. वसतीगृह करिता २७८८ चौ.मी. एकूण ७४३५ चौ.मी. क्षेत्र हे महाराष्ट्र जमीन महसूल शासकीय जमीनीचे वितरण नियम १९७१ चे नियम ६ अन्वये महसूलमुक्त किंमतीवर व नियम ७ अन्वये क्रिडांगणाकरिता २५६५ चौ.मी. क्षेत्र हे १५ वर्षा करिता नाममात्र रु. १/- ( अक्षरी एक ) मात्र भाडेपट्टयावर खालील शर्तीवर मंजूर करीत आहे.

## शर्ती

१. मंजूर केलेले क्षेत्र अथवा त्याचा कोणताही भाग किंवा त्याच्यातील कोणताही हितसंबंध जिल्हाधिकारी [illegible]

२. संस्थेने शाळेच्या इमारत, वसतीगृह व क्रिडांगणाकरिता जमीनीचा वापर केला नाही तर सदर जमीन ही सरकार जमा करण्यात येईल.

३. मंजूर केलेले क्षेत्र संस्थेने नविन शर्तीवर धारण करावे.

४. मंजूर केलेल्या क्षेत्रावर इमारतीचे बांधकाम आदेशाच्या दिनांकापासून २ वर्षात पूर्ण करावे.

५. संस्थेने प्रस्तूत क्षेत्राच्या वापरापासून कोणताही लाभ मिळवता कामा नये.

६. संस्थेने इमारती करिता करावयाच्या बांधकामा चे आराखडयास स्थानिक सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूरी प्राप्त करुन घ्यावी.

७. संस्थेने जमीन मंजूरीच्या आदेशा पासून २ महिन्यात विहित नमूना क्रमांक १ व २ मध्ये कबुलायत करुन दिली पाहिजे. कबुलायतीतील सर्व शर्ती संस्थेस बंधनकारक राहतील.

८. मंजूर केलेल्या जमीनीची मोजणी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शिरपूर यांच्याकडून २ महिन्यात संस्थेने करुन घ्यावी.

९. क्रिडांगण या जागेच्या भाडेपट्टयाची मुदत संपण्याच्या दिनांकाच्या ३ महिन्याच्या अगोदर भाडेपट्टयाची मुदत वाढवून मिळणे बाबत संस्थेने कार्यवाही करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०. मंजूर जमीनीचा उपयोग सार्वजनिक स्वरुपाचा असल्याने सर्व जाती धर्मासाठी खुला राहील.

११. प्रस्तूत क्षेत्राची शासनास आवश्यकता असल्यास ते कोणतेही नुकसान भरपाई न देता परत घेण्यात येईल.

१२. वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास मंजूर क्षेत्र सरकार जमा करण्यात येईल.

मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय, सांगवी
ता. शिरपूर (जि. धुळे)

मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय, सांगवी
ता. शिरपूर (जि. धुळे)

सही / X X X
( संजय सेठी )
जिल्हाधिकारी, धुळे

प्रत :- अध्यक्ष अध्यापक मंडळ, धुळे यांचेकडेस माहितीकरिता रवाना.

प्रत :- तहसिलदार, शिरपूर यांचेकडेस मूळ कागदपत्रांसह पुढील कार्यवाही करिता अग्रेषित. (संचिका पा.क्र. १ ते २५३ )

२/- संस्थेकडून विहित नमून्यांत कबुलायती कराव्यात.

प्रत :- उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांचेकडेस माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.

प्रत :- तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शिरपूर यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.

मुख्याध्यापक
अ.शि.मंडळाचे माध्य. व उ
माध्य.विद्यालय,सांगवी,ता शिरपूर
जि धुळे

जिल्हाधिकारी, धुळे करिता